RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ९, अंक १६२] गुरुवार, डिसेंबर ७, २०२३/अग्रहायण १६, शके १९४५ [पृष्ठे १२, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ४५३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**महसूल व वन विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ७ डिसेंबर २०२३.

**आदेश**

**महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम.**

क्रमांक मुद्रांक-२०२३/प्र.क्र.३४२/म-१(धोरण).—महाराष्ट्र शासनाने, जनहितार्थ तथा लोकहितास्तव तसे करणे आवश्यक असल्याची शासनाची खात्री पटल्यामुळे, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ (१९५८ चा ६०) (यात यापुढे ज्याचा निर्देश, "उक्त अधिनियम" असा केला आहे) याच्या तरतुदी अन्वये आकारण्यायोग्य असलेल्या, यासोबत जोडलेल्या जोडपत्रांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या संलेखावरील मुद्रांक शुल्क व त्यावरील शास्ती माफ करण्याच्या किंवा कमी करण्याच्या दृष्टीने, दोन टप्प्यांमध्ये अंमलबजावणी करावयाच्या, यासोबत जोडलेल्या अनुसूच्यांमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अभय योजना, २०२३ (यात यापुढे जिचा निर्देश, "उक्त अभय योजना, २०२३" असा केला आहे) सुरू करण्याचे ठरविले असून पहिला टप्पा, दिनांक १ डिसेंबर २०२३ ते दिनांक ३१ जानेवारी, २०२४ पर्यंत असेल आणि दुसरा टप्पा, दिनांक १ फेब्रुवारी २०२४ ते दिनांक ३१ मार्च २०२४ पर्यंत असेल.

त्याअर्थी आता, उक्त अधिनियमाच्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, जे संलेख, दिनांक १ जानेवारी, १९८० ते दिनांक ३१ डिसेंबर २०२० या दरम्यान निष्पादित केलेले आहेत अशा, जोडपत्रमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या संलेखांच्या बाबतीत, ते, त्यांची नोंदणी करण्याकरिता सादर तथा दाखल करण्यात आलेले आहेत किंवा नाही हे विचारात न घेता, उक्त अधिनियमाच्या तरतुदींनुसार प्रदेय असलेले मुद्रांक शुल्क व त्यावरील शास्ती, यासोबत जोडलेल्या अनुसूच्यांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेपर्यंत पुढील अटी तथा शर्तींच्या अधीन राहून, माफ किंवा कमी करीत आहे :-

**अटी तथा शर्ती.-**

(१) उक्त अभय योजना, २०२३ ही, याबाबतीत मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकरणाने प्राधिकृत केलेल्या, केवळ शासकीय मान्यताप्राप्त मुद्रांक विक्रेत्याने किंवा कोणत्याही अभिकरणाने किंवा कोणत्याही सक्षम प्राधिकरणाने विक्री केलेल्या कोणत्याही रकमेच्या मुद्रांक पेपरवर जे निष्पादित केलेले आहेत अशा, जोडपत्रामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या संलेखांसाठीच केवळ लागू असेल.

(२) कोणत्याही मुद्रांक शुल्काशिवाय कोऱ्या कागदावर जो निष्पादित केलेला आहे असा कोणत्याही प्रकारचा संलेख किंवा दस्तऐवज, उक्त अभय योजना, २०२३ अंतर्गत मुद्रांक शुल्क व त्यावरील शास्ती माफ किंवा कमी भरण्याचा लाभ मिळण्यासाठी पात्र असणार नाही किंवा स्वीकारण्यात येणार नाही, म्हणजेच, जे कोऱ्या कागदावर केलेले आहेत असे मुद्रांक नसलेले संलेख, उक्त अभय योजना, २०२३ खालील कोणत्याही लाभासाठी पात्र असणार नाहीत;

(३) अर्जदार, यासोबत जोडलेल्या नमुन्यातील अर्ज, मूळ संलेख व आधारभूत दस्तऐवजांच्या स्वयं-साक्षांकित प्रती यासह, यासोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या कालावधीच्या अखेरच्या दिवशी किंवा त्यापूर्वी सादर करील. असा अर्ज, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या ऑनलाइन प्रणालीमार्फत करण्यात येईल.

(४) जेव्हा अशा कोणत्याही संलेखावरील मुद्रांक शुल्काच्या तुटीच्या भागावरील मुद्रांक शुल्क व शास्ती, हा आदेश, **महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये** प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापूर्वी अगोदरच प्रदान करण्यात आलेली असेल तेव्हा, कोणताही परतावा दिला जाणार नाही.

(५) संलेखाच्या पक्षकारस किंवा मालकी हक्कातील त्याचा उत्तराधिकाऱ्यास मुखत्यारपत्र अथवा मुखत्यारपत्र धारकास, या आदेशान्वये, मुद्रांक शुल्क किंवा शास्ती माफ करण्याकरिता किंवा कमी करण्याकरिता अर्ज करता येईल.

(६) अर्जदाराने, संबंधित मुद्रांक जिल्हाधिकाऱ्याने काढलेली मागणी नोटीस मिळाल्यापासून सात दिवसांच्या आत, या आदेशानुसार मुद्रांक शुल्काच्या तुटीच्या भागाचे व शास्तीचे प्रदान करणे आवश्यक असेल, असे करण्यास कसूर केल्यास, अर्जदार, या आदेशाअन्वये तरतूद केलेल्या लाभांसाठी हक्कदार असणार नाही.

(७) निर्धारण करण्याच्या प्रयोजनार्थ, अर्जदाराने, मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, यांनी निर्गमित केलेल्या वार्षिक दर विवरणपत्रामधील व मार्गदर्शक तत्त्वांमधील शर्तींनुसार, त्याचा योग्य पुरावा सादर करावयाचा आहे.

(८) ज्या संलेखांच्या बाबतीत, उक्त अधिनियमाच्या कलम ३१(४), ३२ अ, ३३, ३३अ, किंवा ४६ या अन्वये कारवाई आधीच सुरू करण्यात आलेली आहे अथवा जेव्हा उक्त अधिनियमाच्या तरतुदींखालील कोणत्याही न्यायालयासमोर किंवा प्राधिकरणासमोर निर्णयासाठी अपील किंवा पुनर्विलोकन अर्ज प्रलंबित असेल तेव्हा, उक्त संलेख, या आदेशान्वये लाभ मिळण्यासाठी हक्कदार असतील. तथापि, या आदेशाखालील लाभ मिळविण्यासाठी, अर्जदारास, यासोबत जोडलेल्या नमुन्यामध्ये, मूळ स्वरूपात नवीन अर्ज करावा लागेल :

परंतु, जेव्हा उक्त अधिनियमाच्या तरतुदींखालील कोणत्याही न्यायालयासमोर किंवा प्राधिकरणासमोर निर्णयासाठी अपील किंवा पुनर्विलोकन अर्ज प्रलंबित असेल तेव्हा, अर्जदारास, प्रकरण, बिनशर्तपणे मागे घ्यावे लागेल आणि या आदेशाखालील अर्जासह तशा आशयाचे घोषणापत्र सादर करावे लागेल.

**स्पष्टीकरण.—**

(१) स्टॅम्पड् पेपर म्हणजे, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या कलम २ च्या पोट-कलम (के) "उमट मुद्रांक" मध्ये विनिर्दिष्ट केलेले मुद्रांक यामध्ये योग्य अधिकाऱ्याने लावलेल्या व उमटवलेल्या खूणचिठ्ठ्या मुद्रांकित कागदावर उमटरेखन केलेले किंवा कोरलेले मुद्रांक, फ्रँकिंग यंत्राने उमटवलेला ठसा, राज्यशासनाने अधिसुचनेद्वारे विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही यंत्राने उमटवलेला ठसा, इ-प्रदानाची पावती, इ-एसबीटीआर तसेच, ग्रास प्रणालीद्वारे मुद्रांक शुल्क भरल्याची पावती.

(२) या आदेशाखालील उक्त अभय योजना-२०२३ च्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने अनुसरावयाची मानक कार्यरत कार्यपद्धती निश्चित करून त्याबाबतच्या स्पष्टीकरणात्मक सूचना राज्यशासनामार्फत वेगळ्याने निर्गमित करण्यात येतील.

**अनुसूची- एक**

**दिनांक १ जानेवारी १९८० ते दिनांक ३१ डिसेंबर, २००० (दोन्ही तारखा धरून) या दरम्यान निष्पादित केलेले संलेख.—**

**(अ) पहिला टप्पा: दिनांक १ डिसेंबर २०२३ ते दिनांक ३१ जानेवारी २०२४ पर्यंत:—**

| अ. क्र. | प्रदान करावयाच्या किंवा प्रदेय असलेल्या मुद्रांक शुल्काची रक्कम | प्रदान करावयाच्या किंवा प्रदेय असलेल्या मुद्रांक शुल्कातील कपात किंवा माफी | प्रदान करावयाच्या किंवा प्रदेय असलेल्या संपूर्ण मुद्रांक शुल्कावर आकारण्यात यावयाच्या शास्तीमधील कपात किंवा माफी |
|---|---|---|---|
| १ | एक रुपयापासून ते एक लाख रुपयांपर्यंतच्या (रुपये १ ते रुपये १,००,००० पर्यंतच्या) रकमेसाठी | १००% | १००% |
| २ | एक लाख रुपयांपेक्षा अधिक (रुपये १,००,००० पेक्षा अधिक) असलेल्या रकमेसाठी | ५०% | १००% |

**(ब) दुसरा टप्पा: दिनांक १ फेब्रुवारी, २०२४ ते दिनांक ३१ मार्च,२०२४ पर्यंत:—**

| अ. क्र. | प्रदान करावयाच्या किंवा प्रदेय असलेल्या मुद्रांक शुल्काची रक्कम | प्रदान करावयाच्या किंवा प्रदेय असलेल्या मुद्रांक शुल्कातील कपात किंवा माफी | प्रदान करावयाच्या किंवा प्रदेय असलेल्या संपूर्ण मुद्रांक शुल्कावर आकारण्यात यावयाच्या शास्तीमधील कपात किंवा माफी |
|---|---|---|---|
| १ | एक रुपयापासून ते एक लाख रुपयांपर्यंतच्या (रुपये १ ते रुपये १,००,००० पर्यंतच्या) रकमेसाठी | ८०% | ८०% |
| २ | एक लाख रुपयांपेक्षा अधिक (रुपये १,००,००० पेक्षा अधिक) असलेल्या रकमेसाठी | ४०% | ७०% |

**अनुसूची- दोन**

**दिनांक १ जानेवारी २००१ ते दिनांक ३१ डिसेंबर २०२० (दोन्ही तारखा धरून) या दरम्यान निष्पादित केलेले संलेख.-**

**(अ) पहिला टप्पा: दिनांक १ डिसेंबर २०२३ ते दिनांक ३१ जानेवारी २०२४ पर्यंत:—**

| अ. क्र. | प्रदान करावयाच्या किंवा प्रदेय असलेल्या मुद्रांक शुल्काची रक्कम | प्रदान करावयाच्या किंवा प्रदेय असलेल्या मुद्रांक शुल्कातील कपात किंवा माफी | प्रदान करावयाच्या किंवा प्रदेय असलेल्या संपूर्ण मुद्रांक शुल्कावर आकारण्यात यावयाच्या शास्तीमधील कपात किंवा माफी |
|---|---|---|---|
| १ | एक रुपयापासून ते पंचवीस कोटी रुपयांपर्यंतच्या (रुपये १ ते रुपये २५,००,००,००० पर्यंतच्या) रकमेसाठी | २५% | (१) जर प्रदान करावयाच्या किंवा प्रदेय असलेल्या संपूर्ण मुद्रांक शुल्कावर आकारण्यात यावयाची शास्ती, रुपये २५,००,००० पेक्षा (पंचवीस लाख रुपयांपेक्षा) कमी असेल तर, प्रदान |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | करावयाच्या किंवा प्रदेय असलेल्या संपूर्ण मुद्रांक शुल्कावर आकारण्यात यावयाच्या शास्तीवर द्यावयाची शास्तीतील कपात ९०% इतकी असेल. |
| | | | (२) जर प्रदान करावयाच्या किंवा प्रदेय असलेल्या संपूर्ण मुद्रांक शुल्कावर आकारण्यात यावयाची शास्ती, रुपये २५,००,००० पेक्षा (पंचवीस लाख रुपयांपेक्षा) अधिक असेल तर, शास्ती म्हणून स्वीकाराची रक्कम, केवळ रुपये २५,००,००० (पंचवीस लाख रुपयांपेक्षा) इतकी असेल आणि उर्वरित किंवा शिल्लक शास्ती माफ करण्यात येईल. |
| २ | पंचवीस कोटी रुपयांपेक्षा अधिक (रुपये २५,००,००,००० पेक्षा अधिक) असलेल्या रकमेसाठी | २०% | शास्ती म्हणून स्वीकाराची रक्कम, रुपये १,००,००,००० (एक कोटी रुपये) इतकी असेल आणि उर्वरित किंवा शिल्लक शास्ती माफ करण्यात येईल. |

**(ब) दुसरा टप्पा: दिनांक १ फेब्रुवारी, २०२४ ते दिनांक ३१ मार्च,२०२४ पर्यंत:—**

| अ. क्र. | प्रदान करावयाच्या किंवा प्रदेय असलेल्या मुद्रांक शुल्काची रक्कम | प्रदान करावयाच्या किंवा प्रदेय असलेल्या मुद्रांक शुल्कातील कपात किंवा माफी | प्रदान करावयाच्या किंवा प्रदेय असलेल्या संपूर्ण मुद्रांक शुल्कावर आकारण्यात यावयाच्या शास्तीमधील कपात किंवा माफी |
|---|---|---|---|
| १ | एक रुपयापासून ते पंचवीस कोटी रुपयांपर्यंतच्या (रुपये १ ते रुपये २५,००,००,००० पर्यंतच्या) रकमेसाठी | २०% | (१) जर प्रदान करावयाच्या किंवा प्रदेय असलेल्या संपूर्ण मुद्रांक शुल्कावर आकारण्यात यावयाची शास्ती, रुपये ५०,००,००० पेक्षा (पन्नास लाख रुपयांपेक्षा) कमी असेल तर, प्रदान करावयाच्या किंवा प्रदेय असलेल्या संपूर्ण मुद्रांक शुल्कावर आकारण्यात यावयाच्या शास्तीवर द्यावयाची शास्तीतील कपात ८०% इतकी असेल.<br>(२) जर प्रदान करावयाच्या किंवा प्रदेय असलेल्या संपूर्ण मुद्रांक शुल्कावर आकारण्यात यावयाची शास्ती, रुपये ५०,००,००० पेक्षा (पन्नास लाख रुपयांपेक्षा) अधिक असेल तर, शास्ती म्हणून स्वीकाराची रक्कम, केवळ रुपये ५०,००,००० (पन्नास लाख रुपये) इतकी असेल आणि उर्वरित किंवा शिल्लक शास्ती माफ करण्यात येईल. |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | पंचवीस कोटी रुपयांपेक्षा अधिक (रुपये २५,००,००,००० पेक्षा अधिक) असलेल्या रकमेसाठी | १०% | शास्ती म्हणून स्वीकाराची रक्कम, रुपये २,००,००,००० (दोन कोटी रुपये) इतकी असेल आणि उर्वरित किंवा शिल्लक शास्ती माफ करण्यात येईल. |

## जोडपत्र

(अ) निवासी किंवा अनिवासी किंवा औद्योगिक वापराच्या प्रयोजनार्थ अभिहस्तांतरणपत्र केलेले अभिहस्तांतरणपत्र किंवा विक्री करार किंवा भाडेपट्टा किंवा विक्री प्रमाणपत्र किंवा बक्षीसपत्र अथवा हक्कविलेख-निक्षेप, हडप, तारण, किंवा तारणगहाण निक्षेपित करण्याशी संबंधित असणारा करारनामा यांच्याशी संबंधित असलेला कोणत्याही प्रकारचा संलेख;

(ब) करारनामा किंवा त्याचा अभिलेख अथवा कराराचे ज्ञापन, जर ते निवासी वापराच्या प्रयोजनाकरिता स्थावर मालमत्तेच्या भाडेदारीचे हस्तांतरण करण्याशी संबंधित असतील तर, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) आणि त्याची विभागीय मंडळे, महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित (सिडको) यांच्याकडून आणि झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून (एसआरए) मान्यताप्राप्त झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत पुनर्वसनाच्या प्रयोजनार्थ झोपडपट्टीधारकांना निवासी किंवा अ-निवासी युनिटांचे किंवा घरांचे वाटप करण्याचे अभिहस्तांतरणपत्र अथवा ज्यांचे मानीव अभिहस्तांतरणपत्र प्रलंबित आहेत अशा, नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील युनिटांचे किंवा घरांचे अथवा कोणत्याही वेश्मांचे वाटप करण्याचे अभिहस्तांतरणपत्र;

(क) ज्यांचा पुनर्विकास करणे आवश्यक आहे अशा कोणत्याही मोडकळीस आलेल्या जुन्या इमारतींचा किंवा कोणत्याही इमारतीचा किंवा स्थावर मालमत्तेचा पुनर्विकास करण्याशी संबंधित असणारा कोणत्याही प्रकारचा विकास करारनामा किंवा अभिहस्तांतरणपत्र किंवा विक्री करार किंवा विकासकाकडे हक्क अभिहस्तांकित करण्याच्या व्यवहाराचा संलेख;

(ड) कंपन्यांचे एकत्रीकरण, विलीनीकरण, विभाजन, व्यवस्था किंवा पुनर्रचना करण्याच्या बाबतीतील कोणत्याही प्रकारचा संलेख;

(इ) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) आणि त्याची विभागीय मंडळे, महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित (सिडको) आणि महानगरपालिका, **नगरपरिषद, नगरपंचायत** यांनी, अथवा विहित केलेल्या विनियमांन्वये शासनाने मान्यता दिलेली किंवा घटित केलेली विविध विकास किंवा नियोजन प्राधिकरणे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी), झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (एसआरए), इत्यादी, प्राधिकरणांनी निष्पादित केलेला कोणत्याही प्रकारचा संलेख;

(फ) शासकीय जमिनीवरील नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थेने किंवा महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाने (म्हाडा) आणि त्याच्या विभागीय मंडळांनी किंवा महाराष्ट्र शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादितने किंवा महानगरपालिका, **नगरपरिषद, नगरपंचायत** यांनी अथवा विहित केलेल्या विनियमांन्वये शासनाने मान्यता दिलेल्या किंवा घटित केलेल्या विविध विकास किंवा नियोजन प्राधिकरणांनी, निवासी किंवा अनिवासी युनिटांच्या संबंधात निर्गमित केलेले किंवा निष्पादित केलेले पहिले वाटप पत्र किंवा भाग प्रमाणपत्र.

## नमूना

## अर्जाचा नमूना

दिनांक :

अर्जदाराचे नाव :

पत्ता :

भ्रमणध्वनी/ दूरध्वनी क्रमांक :

ई-मेल आयडी :

पॅन क्रमांक :

बँकेचे नाव व खाते क्रमांक :

प्रति,

मुद्रांक जिल्हाधिकारी / सह जिल्हा निबंधक / दुय्यम निबंधक,

........................................................................

........................................................................

**विषयः** महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अधिनियमाच्या तरतुदींअन्वये प्रदेय असलेल्या मुद्रांक शुल्काच्या तुटीच्या भागावरील मुद्रांक शुल्कात व शास्तीत कपात करण्यासंबंधी महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अभय योजना, २०२३ द्वारे तरतूद केलेला लाभ मिळण्याकरिता अर्ज.

**संदर्भः** महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आदेश क्र. मुद्रांक-२०२३/प्र.क्र.३४२/म-१ (धोरण), दिनांक ७ डिसेंबर २०२३.

महोदय,

मी, खाली सही करणार, श्री./श्रीमती -------------------------------------------, माझ्या वतीने किंवा श्री./श्रीमती ------------------------------------------- यांच्या वतीने, महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अधिनियमाच्या तरतुदींअन्वये प्रदेय असलेल्या मुद्रांक शुल्काच्या तुटीच्या भागावरील मुद्रांक शुल्कात व शास्तीत कपात करण्यासंबंधी महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अभय योजना, २०२३ द्वारे तरतूद केलेला लाभ मिळण्याकरिता, मूळ संलेख व आधारभूत दस्तऐवजांच्या स्वयं-साक्षांकित प्रती यासह, या अर्जाद्वारे, तुम्हाला विनंती करतो/करते.

**संलेखांचा तपशील.-**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | दस्तऐवजाचा प्रकार | : | |
| २ | निष्पादित केल्याचा दिनांक | : | |
| ३ | मान्य केलेला मोबदला | : | |
| ४ | मालमत्तेचा तपशील | : | |
| | (अ) मालमत्तेचा सविस्तर पत्ता (सदनिका/ युनिट क्रमांक, इमारत क्रमांक व नाव, स्थान, इत्यादी) | : | |
| | (ब) गाव/ क्षेत्र/ प्रभाग, इत्यादी. | : | |
| | (क) अनुक्रमांक/ सी. एस. क्रमांक/ सी.टी.एस. क्रमांक/ भूखंड क्रमांक, इत्यादी. | : | |
| ५ | मालमत्तेचे क्षेत्र | : | |
| | चटई क्षेत्र | : | |
| | बांधीव क्षेत्र | : | |
| ६ | बाजारमूल्य प्रभावित करणारे अन्य घटक | : | |
| | (अ) बांधकामाचा प्रकार | : | |
| | (ब) बांधकामाचे वर्ष | : | |
| | (क) मजल्यांची संख्या | : | |
| | (ड) लिफ्ट (होय/ नाही) | : | |
| ७ | दस्तऐवजावर आधीच प्रदान केलेले मुद्रांक शुल्क, कोणतेही असल्यास | : | |
| | (अ) रक्कम रुपये | : | |
| | (ब) मुद्रांकाचा दिनांक | : | |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | प्राधिकृत केलेल्या व्यक्तीचा तपशील (मुखत्यारपत्रासह) | : | |
| | व्यक्तीचे नाव | : | |
| | भ्रमणध्वनी क्रमांक | : | |
| | ई-मेल आयडी | : | |

मी, याद्वारे असे घोषित करतो/करते की, वरील माहिती, माझ्या संपूर्ण माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे खरी व अचूक आहे. वर घोषित केलेल्या तपशिलाच्या पुष्ट्यर्थ, स्वयं-साक्षांकित केलेले पुरावे मी यासोबत जोडलेले आहेत.

आपला विश्वासू,

दिनांक : (स्वाक्षरी)

ठिकाण : अर्जदाराचे नाव

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्रितमकुमार व. जावळे,**
शासनाचे अवर सचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 7th December 2023.

### Order

MAHARASHTRA STAMP ACT.

No.Mudrank-2023/C.R.No.342/M-1(Policy).—Whereas, the Government of Maharashtra, being satisfied that it is necessary to do so in the public interest, has decided to introduce the Maharashtra Stamp Duty Amnesty Scheme-2023 (hereinafter referred to as 'the said Amnesty Scheme-2023') in order to remit or reduce stamp duty and the penalty on the instrument as specified in the Annexure appended hereto, chargeable under the provision of the Maharashtra Stamp Act (LX of 1958) (hereinafter referred to as 'the said Act'), as specified in the Schedules appended hereto to be implemented in two phases, the first phase shall be from the 1st December 2023 till the 31st January 2024 and the Second phase shall be from the 1st February 2024 till the 31st March 2024.

Now, therefore, the Government of Maharashtra, in exercise of the powers conferred by clause (a) of section 9 of the said Act and of all other powers enabling it in this behalf, hereby remits or reduces the stamp duty and penalty to the extent as specified in the Schedules appended hereto, payable as per the provisions of the said Act, in respect of instruments specified in the Annexure, which are executed between the 1st January 1980 and 31st December 2020, irrespective of whether they are presented for the registration thereof or not, subject to the following conditions, namely:-

**Conditions,—**

(1) The said Amnesty Scheme-2023 shall be applicable only to the instruments as specified in the Annexure which are executed on any amount of Stamped Paper exclusively sold by the Government approved Stamp Vendors or any agency or any competent authority authorised by the Chief Controlling Revenue Authority in this behalf.

(2) Any type of instrument or document which is executed on plain paper without any stamp duty shall not be eligible or accepted for the benefit of remission or reduction in stamp duty or penalty under the said Amnesty Scheme-2023; *i.e.* unstamped instruments which are executed on plain papers shall not be eligible for any benefit under the said Amnesty Scheme-2023;

(3) The applicant shall submit an application in the Form appended hereto, along with original instrument and self-attested copies of supporting documents on or before the last day of the period mentioned in the Schedules appended here to. Such an application shall be made through online system of the Inspector General of Registration and Controller of Stamps, Maharashtra State, Pune.

(4) No refund shall be granted where stamp duty or penalty on the deficient portion of duty has already been paid on any of such instruments, prior to the date of publication of this Order in the *Maharashtra Government Gazette*.

(5) The party to the instrument or his successor in title or power of attorney holder may apply for remission or reduction of stamp duty or penalty under this Order.

(6) The applicant shall be required to pay the deficient portion of stamp duty and penalty as per this Order within a period of seven days from the date of receipt of the demand notice issued by the concerned Collector of Stamps, failing which the applicant shall not be entitled for the benefits provided under this Order.

(7) For the purpose of assessment, the applicant has to submit proper evidence thereof as per requirements in the Annual Statement of Rates and Guidelines issued by the Chief Controlling Revenue Authority, Maharashtra State.

(8) The said instruments, for which action under section 31(4), 32A, 33, 33A or 46 of the said Act has already been initiated or where appeal or review application is pending for decision, before any Court or Authority under the provisions of the said Act, shall be entitled for the benefits under this Order. However, to avail of the benefits under this Order, the applicant shall have to make a fresh application in original in the Form appended hereto:

Provided that, in case where appeal or review application is pending for decision, before any Court or Authority under the provisions of the said Act, the applicant shall have to unconditionally withdraw the case and submit a declaration to that effect along with application under this Order.

*Explanation.—*

(1) Stamped Papers means, the impressed stamps as specified in the Sub-Section (k) of Section 2 of the said Act; which includes, labels affixed and impressed by the proper officer; stamps embossed or engraved on stamped paper; impression by franking machine; impression by any such machine as the State Government may, by notification in the *Official Gazette*, specify *i.e.* e-SBTR;, receipt of e-payment, G.R.A.S.

(2) The Standard Operating Procedure to be followed for the implementation of the said Amnesty Scheme-2023 under this Order shall be issued by the State Government, separately

*Schedule-I*

**Instruments which are executed between dated the 1st January 1980 and dated the 31st December 2000 (inclusive of both dates).—**

**(A) First phase from dated the 1st December 2023 till dated the 31st January 2024:—**

| Sr. No. | Amount of stamp duty to be paid or payable. | Reduction or remission in stamp duty to be paid or payable. | Reduction or remission in penalty to be charged on whole stamp duty to be paid or payable. |
|---|---|---|---|
| 1 | For amount from One rupees upto One Lakh rupees (Rs.1/- upto Rs.1,00,000/- ) | 100% | 100% |
| 2 | For amount exceeding rupees One Lakh (exceeding Rs.1,00,000/-) | 50% | 100% |

**(B) Second phase from dated the 1st February 2024 till dated the 31st March 2024:—**

| Sr. No. | Amount of stamp Duty to be paid or payable | Reduction or remission in stamp duty to be paid or payable. | Reduction or remission in penalty to be charged on whole stamp duty to be paid or payable |
|---|---|---|---|
| 1 | For amount from One rupees upto One Lakh rupees (Rs.1/- upto Rs.1,00,000/- ) | 80% | 80% |
| 2 | For amount exceeding rupees One Lakh (exceeding Rs.1,00,000/-) | 40% | 70% |

*Schedule-II*

**Instruments which are executed between dated the 1st January 2001 and dated the 31st December, 2020 (inclusive of both dates).—**

**(A) First phase from dated the 1st December 2023 till dated the 31st January, 2024:—**

| Sr. No. | Amount of stamp duty to be paid or payable | Reduction or remission in stamp duty to be paid or payable. | Reduction or remission in penalty to be charged on whole stamp duty to be paid or payable |
|---|---|---|---|
| 1 | For amount from One rupees upto Twenty Five Crore rupees (From Rs.1/- upto Rs.25,00,00,000/-) | 25% | (1) If the penalty to be charged on whole stamp duty to be paid or payable is less than Rs.25,00,000/- (Twenty Five Lakh Rupees) then |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | 90% reduction in penalty be given on the penalty to be charged on whole Stamp Duty to be paid or payable; |
| | | | (2) If the penalty to be charged on whole stamp duty to be paid or payable is more than Rs.25,00,000/- (Twenty Five Lakh Rupees) then only Rs.25,00,000/- (Twenty Five Lakh Rupees) to be accepted as a penalty and rest or balance penalty shall be remitted. |
| 2 | For amount exceeding rupees Twenty Five Crore (exceeding Rs.25,00,00,000/-) | 20% | Rs.1,00,00,000/- (One Crore Rupees) be accepted as a penalty and rest or balance penalty shall be remitted. |

**(B) Second phase from the 1st February, 2024 till the 31st March, 2024—**

| Sr. No. | Amount of stamp duty to be paid or payable | Reduction or remission in stamp duty to be paid or payable. | Reduction or remission in penalty to be charged on whole stamp duty to be paid or payable |
|---|---|---|---|
| 1 | For amount from One rupees upto Twenty Five Crore rupees (Rs.1/- upto Rs.25,00,00,000/-) | 20% | (1) If the penalty to be charged on whole stamp duty to be paid or payable is less than Rs.50,00,000/- (Fifty Lakh Rupees) then 80% reduction in penalty shall be given on the penalty to be charged on whole Stamp Duty to be paid or payable;<br>(2) If the penalty to be charged on whole stamp duty to be paid or payable is more than Rs.50,00,000/- (Fifty Lakh Rupees) then only Rs.50,00,000/- (Fifty Lakh Rupees) shall be accepted as a penalty and rest or balance penalty be remitted. |
| 2 | For amount exceeding rupees Twenty Five Crore (exceeding Rs.25,00,00,000/-) | 10% | Rs.2,00,00,000/- (Two Crore Rupees) be accepted as a penalty and rest or balance penalty shall be remitted. |

*ANNEXURE*

(*a*) Any type of Instrument related to the Conveyance or Agreement to sale or Lease or Sale Certificate or Gift or Agreement relating to deposit of title deeds, pawn, pledge or hypothecation of immovable property for the purpose of residential or non-residential or industrial use;

(*b*) Agreement or its records or Memorandum of agreement if relating to transfer of tenancy of immovable property for the purpose of residential use, Conveyance of allotment of residential or non-residential units or houses from the Maharashtra Housing and Area Development Authority (MHADA) and its Divisional Boards, the City and Industrial Development Corporation of Maharashtra Limited (CIDCO) and the Slum Rehabilitation Authority (SRA) to a slum dweller for the purposes of rehabilitation under approved Slum Rehabilitation Scheme and also Conveyance of allotment of residential or non-residential units or houses in registered Co-operative Housing Societies or any apartments whose deemed conveyance is pending;

(*c*) Any type of Development Agreement or Conveyance or Agreement to Sale or Instrument of transaction of Assignment of the rights to the developer regarding the redevelopment of any dilapidated old buildings or any building or immovable property whose redevelopment is necessary;

(*d*) Any type of Instrument in respect of the amalgamation, merger, demerger, arrangement or reconstruction of companies;

(*e*) Any type of Instrument executed by the Maharashtra Housing and Area Development Authority (MHADA) and its Divisional boards, the City and Industrial Development Corporation of Maharashtra Limited (CIDCO) and the Municipal Corporation, Municipal Council, *Nagar Panchayat*, by the various Development or Planning Authorities approved or constituted by the Government under the prescribed Regulations, the Maharashtra Industrial Development Corporation (MIDC), the Slum Rehabilitation Authority (SRA) etc. authorities;

(*f*) The First allotment letter or Share Certificate issued or executed regarding residential or non-residential units by the registered Co-operative Housing Society on the Government land or by the Maharashtra Housing and Area Development Authority (MHADA) and its Divisional boards or by the City and Industrial Development Corporation of Maharashtra Limited (CIDCO) or by the Municipal Corporation, Municipal Council, *Nagar Panchayat* or by the Development or Planning Authorities approved or constituted by the Government under the prescribed Regulations.

**FORM**

**FORM OF APPLICATION**

Date :

| | |
|---|---|
| Name of Applicant | : |
| Address | : |
| Mobile/Phone No. | : |
| E-mail ID | : |
| PAN Number | : |
| Bank Name and Account Number | : |

To,

The Collector of Stamps/Joint District Registrar/Sub-Registrar,

..............................................

..............................................

**Subject :** Application for getting the benefit provided by the Maharashtra Stamp Duty Amnesty Scheme-2023 regarding reduction in stamp duty and penalty on the deficient portion of duty payable under the provisions of the Maharashtra Stamp Act.

**Reference :** Government of Maharashtra, Revenue and Forests Department, Order No.Mudrank-2023/ C.R.No.342/M-1(Policy) dated the 7th December 2023.

Sir,

I, the undersigned, Shri/Smt./.................... for myself or on behalf of Shri/Smt./................., requesting you by this application alongwith original instrument and self-attested copies of supporting documents for getting the benefit provided by the Maharashtra Stamp Duty Amnesty Scheme-2023 regarding reduction in stamp duty and penalty on the deficient portion of duty payable under the provisions of the Maharashtra Stamp Act.

**Details of Instruments.—**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Type of document | : | | | | | |
| 2 | Date of execution | : | | | | | |
| 3 | Agreed consideration | : | | | | | |
| 4 | Details of the property | : | | | | | |
| | (*a*) Detailed address of property (Flat/Unit No., Building No. and Name, location, etc.) | : | | | | | |
| | (*b*)Village/Area/Ward etc. | : | | | | | |
| | (*c*) S.No./C.S.No./ C.T.S. No./Plot No. etc. | | | | | | |
| 5 | Area of property | | | | | | |
| | Carpet Area | | | | | | |
| | Built up Area | | | | | | |
| 6 | Other factors affecting the market value | | | | | | |
| | (*a*) Type of Construction | : | | | | | |
| | (*b*) Year of Construction | : | | | | | |
| | (*c*) No. of Floors. | : | | | | | |
| | (*d*) Lift ( Yes / No ) | : | | | | | |
| 7 | Stamp duty already paid, if any, on the document. | | | | | | |
| | (*a*) Amount Rs. | : | | | | | |
| | (*b*) Date of stamping | : | | | | | |
| 8 | Details of the person authorized (alongwith Power of Attorney) | | | | | | |
| | Name of person | : | | | | | |
| | Mobile Number | : | | | | | |
| | E-Mail ID | : | | | | | |

I hereby declare that the above information is true and correct to the best of my knowledge and belief. I have enclosed the self-attested proofs in support of the above declared details.

Yours faithfully,

Date : (Signature)

Place: Name of the applicant

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRITAMKUMAR V. JAWALE,
Under Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.